I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 396-400
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींचा अबंध निधीच्या माध्यमातून विकास याविषयी लाभार्थ्यांचे मत

संतोष सितारामजी आडे
एस.आर.एम. कॉलेज ऑफ सोशल वर्क, पडोली, चंद्रपूर.
*Corresponding Author: 1234adesantosh@gmail.com

| Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023<br>Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023 |
|---|---|---|

**सारांश :-**

पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अबंध निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. यासाठी ग्रामसभा कोषाचे स्वतंत्र बँक खाते आवश्यक आहे. शासनाकडून प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ग्रामसभाकोषाच्या खात्यावर निधी थेट बँकेमार्फत वितरीत करण्यात येतो. वर्षाच्या सुरुवातीलाच निधी जमा होणार असल्यामुळे वर्षभरात तो आपल्या गावाच्या विकासासाठी नियोजनबद्ध पद्धतीने वापरता येईल. आपल्या ग्रामपंचायतीअंतर्गत असलेली गावे, पाडे व वाड्या यांच्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात हा निधी वापरावयाचा आहे. त्यामुळे सर्वांना समान लाभ मिळून विकासापासून कुणीही वंचित राहणार नाही. ग्रामपंचायतींना मिळालेल्या निधीतून घ्यावयाची कामे ग्रामसभेमध्ये सर्वानुमते ठरविणे आवश्यक आहे. त्यामुळे ग्रामसभेच्या माध्यमातून लवकर निर्णय घेता येतील आणि त्याची अंमलबजावणी देखील तितक्याच तत्परतेने होऊ शकेल. ग्रामसभेच्या मान्यतेने आपल्या गावाची 'ग्रामसभाकोष समिती' निधीचा खर्च करेल. ग्रामसभेने केलेली कामाची निवड म्हणजेच निवड केलेल्या कामास प्रशासकीय मान्यता दिली असल्याचे समजण्यात येईल. तीन लाखाच्या आतील विकास कामांना स्वतंत्रपणे तांत्रिक मान्यतेची देखील आवश्यकता राहणार नाही. तीन लाखापेक्षा जास्त खर्चाचे विकास काम असेल तर प्राधिकृत अधिकाऱ्याची मान्यता घ्यावी लागेल.
गावाला मिळालेल्या निधीचा वापर करण्याचे स्वातंत्र्य ग्रामसभेला मिळाले आहे. पण त्याचबरोबर निधीचा योग्य प्रकारे वापर करण्याची मोठी जबाबदारी देखील ग्रामसभेवर आलेली. यासाठी ग्रामसभेने अबंध निधीचा वार्षिक नियोजन आराखडा तयार करुन दरवर्षी १ मे रोजी होणाऱ्या ग्रामसभेमध्ये वार्षिक आराखड्याला मान्यता घेणे बंधनकारक आहे. आराखडा तयार करताना गाव, पाडे, वाड्या येथील ग्रामस्थांचा विचार घेणे आवश्यक आहे.

**बीजसंज्ञा :-** पेसा, ग्रामसभा, अबंध निधी, विकास.

## प्रस्तावना :-

भारतात जवळपास ७०० आदिवासी जमाती आहेत. त्यापैकी ४५ जमाती महाराष्ट्रात आढळतात. प्रत्येक आदिवासी जमातीच्या रुढी, परंपरा आणि जीवन जगण्याच्या पद्धती वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आदिवासींना त्यांची संस्कृती, परंपरा आणि त्यांच्या भोवतालचा नैसर्गिक परिसर, वनक्षेत्र, वन्यजीव, गौणखनिजे, औषधी वनस्पती यांचे जतन करता यावे याकरीता पंचायत (अनुसूचित क्षेत्र विस्तार) अधिनियम १९९६ तसेच वनहक्क अधिनियम २००६ अशा कायद्याद्वारे आदिवासी ग्रामसभांना विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत. आदिवासींच्या विकासासाठी शासनाने स्वतंत्र आदिवासी उपयोजना लागू केलेली आहे. या उपयोजनेमार्फत आदिवासी क्षेत्राच्या विकासाकरीता विशेष निधीची तरतूद करण्यात येते. ज्याचा विनियोग केवळ आदिवासींच्या विकासाकरीता करणे बंधनकारक आहे. आदिवासी जमातींची संस्कृती, रुढी, परंपरा आणि जीवन जगण्याच्या पद्धती जतन करता याव्यात अशा पद्धतीने त्यांच्या विकासाच्या वैशिष्टयपूर्ण गरजा लक्षात घेऊन ग्रामसभेच्या माध्यमातून विकासाचे उपक्रम ठरविणे आवश्यक आहे.

समाजाच्या मुख्य प्रवाहापासून आजही दूर असलेल्या आदिवासी भागातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी,

त्या भागाच्या सामाजिक, नैसर्गिक आणि भौगोलिक संपन्नतेसाठी करण्यात आलेला पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) अधिनियम (पेसा) कायदा म्हणजे आदिवासी लोकांच्या आयुष्यात सकारात्मक परिणाम करणारा आहे. या लोकांना स्वयंसिद्ध करण्याचा प्रयत्न या कायद्याच्या निर्मितीमागे असून शहरी भागाच्या तुलनेने येथील लोकांना अमर्यादित अधिकारी देण्यात आले आहेत. मात्र, ह्या वर्षांपूर्वी तयार करण्यात आलेल्या या कायद्याची अद्याप पूर्णपणे माहिती आदिवासी भागातील नागरिकांना नाही. या कायद्याने त्यांना मिळालेल्या अधिकारांती जाणीव त्यांना नाही. त्यामुळे या कायद्याचा प्रचार व प्रसार करणे तितकेच आवश्यक बनले आहे. या कायद्याची अंमलबजावणी झाल्यास निश्चितच हा कायदा वरदान ठरेल.

**पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींचा अबंध निधीच्या माध्यमातून विकास :—**

आतापर्यंत केंद्रीय नियोजन पद्धतीने गावाचा विकास करण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे. मात्र ७३व्या घटना दुरुस्तीबरोबरच पेसा आणि वनहक्क कायदा यातील तरतुदींमुळे आदिवासींच्या लोकसहभागातून त्यांच्या विकासाचा प्रयत्न सुरु झाला आहे.

भारतीय राज्य घटनेच्या अनुसूची ५ मधील परिच्छेद ५, उपपरिच्छेद (१) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन ३० ऑक्टोबर २०१४ अन्वये विविध कायद्यांच्या अनुषंगाने अधिसूचना निर्गमित केली आहे. त्यामध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (III) १९५९ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यासाठी मंत्री मंडळाच्या ९ एप्रिल २०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला आहे. त्यात राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना दरवर्षी आदिवासी उपयोजनेच्या एकूण तरतूदीपैकी ५ टक्के निधी उपलब्ध करुन देण्याच्या योजनेस (पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ टक्के थेट निधी) मान्यता देण्यात आलेली आहे.

या निधीचा उपयोग करताना पुढे दिलेल्या बाबींवर प्राधान्याने खर्च करणे अपेक्षित आहे.त्यात प्रामुख्याने,

१) पायाभूत सुविधा, २) वनहक्क अधिनियम व पेसा कायद्याची अंमलबजावणी, ३) आरोग्य, स्वच्छता, शिक्षण व ४) वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वनउपजीविका या बाबींकरीता उपलब्ध निधींपैकी प्रत्येकी २५% निधी या प्रमाणात खर्च करावा.

पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अबंध निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. यासाठी ग्रामसभा कोषाचे स्वतंत्र बँक खाते आवश्यक आहे. शासनाकडून प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ग्रामसभाकोषाच्या खात्यावर निधी थेट बँकेमार्फत वितरीत करण्यात येतो. वर्षाच्या सुरुवातीलाच निधी जमा होणार असल्यामुळे वर्षभरात तो आपल्या गावाच्या विकासासाठी नियोजनबद्ध पद्धतीने वापरता येईल. आपल्या ग्रामपंचायतीअंतर्गत असलेली गावे, पाडे व वाड्या यांच्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात हा निधी वापरावयाचा आहे. त्यामुळे सर्वांना समान लाभ मिळून विकासापासून कुणीही वंचित राहणार नाही. ग्रामपंचायतींना मिळालेल्या निधीतून घ्यावयाची कामे ग्रामसभेमध्ये सर्वानुमते ठरविणे आवश्यक आहे. त्यामुळे ग्रामसभेच्या माध्यमातून लवकर निर्णय घेता येतील आणि त्याची अंमलबजावणी देखील तितक्याच तत्परतेने होऊ शकेल. ग्रामसभेच्या मान्यतेने आपल्या गावाची ‘ग्रामसभाकोष समिती’ निधीचा खर्च करेल. ग्रामसभेने केलेली कामाची निवड म्हणजेच निवड केलेल्या कामास प्रशासकीय मान्यता दिली असल्याचे समजण्यात येईल. तीन लाखाच्या आतील विकास कामांना स्वतंत्रपणे तांत्रिक मान्यतेची देखील आवश्यकता राहणार नाही. तीन

लाखापेक्षा जास्त खर्चाचे विकास काम असेल तर प्राधिकृत अधिकाऱ्याची मान्यता घ्यावी लागेल.

गावाला मिळालेल्या निधीचा वापर करण्याचे स्वातंत्र्य ग्रामसभेला मिळाले आहे. पण त्याचबरोबर निधीचा योग्य प्रकारे वापर करण्याची मोठी जबाबदारी देखील ग्रामसभेवर आलेली. यासाठी ग्रामसभेने अबंध निधीचा वार्षिक नियोजन आराखडा तयार करुन दरवर्षी १ मे रोजी होणाऱ्या ग्रामसभेमध्ये वार्षिक आराखड्याला मान्यता घेणे बंधनकारक आहे. आराखडा तयार करताना गाव, पाडे, वाड्या येथील ग्रामस्थांचा विचार घेणे आवश्यक आहे.

अबंध निधीतून विकास कामे हाती घेताना इतर योजनाखाली होऊ शकणारी नेहमीची कामे सोडून काही वेगळी आणि विशेष स्वरुपाची गावाला आवश्यक अशी कामे करता येतील. त्यामुळे गावाचा सर्वांगीण आणि समतोल विकास होऊन गाव स्वावलंबी होऊ शकेल. विकास कामांची निवड करताना आपल्याला खाली दिलेल्या बाबींचा साकल्याने विचार करणे आवश्यक आहे.

- गावात रोजगार वृद्धी होण्यासाठी कौशल्यवृद्धी, रोजगार विकास व उत्पन्न वाढ कशी होईल या बाबीकडे लक्ष देणे आवश्यक आहे.
- सार्वजनिक सुविधा उदा. भात गिरणी, धान्य बँक इ. उपक्रम राबविता येतील.
- आरोग्य, शिक्षण, पोषण या अनुषंगाने उपलब्ध करुन देता येणाऱ्या सेवांचे बळकटीकरण करता येईल.
- दळण–वळण आणि दूरसंचार सेवांचे बळकटीकरण करता येईल.
- छोटे तलाव, गौण खनिजे, वनोपज इ. चे व्यवस्थापन करता येईल.
- पर्यटन विकासाचा उपक्रम राबविता येईल.
- दुर्गम भागामध्ये आवश्यक असणाऱ्या अतिरिक्त सुविधा किंवा त्यासाठी आवश्यक कर्मचारी देता येतील.
- सार्वजनिक उपलब्ध संसाधनांचे जतन आणि व्यवस्थापन करता येईल.
- सार्वजनिक वनहक्काचे उपक्रम राबविता येतील.
- पूर्वी गावात उपलब्ध असलेल्या परंतु ना–दुरुस्त झालेल्या सोयी सुविधांची दुरुस्ती आणि पुनरुज्जीवन करणे शक्य आहे.
- ग्रामपंचायत व ग्रामसभा सक्षमीकरणाकरीता उपाययोजना करता येईल.

पेसा ग्रामपंचायतींना प्राप्त होणाऱ्या अबंध निधीतून गरजेनुसार गाव विकासाच्या कामात मदतीसाठी ग्रामसभेचा ठराव करुन कंत्राटी कर्मचारी नेमता येतील. गावातील विविध समित्या गावाच्या विकासात सहकार्य करतील. ग्रामसभेच्या मागणीनुसार प्रशासकिय विभागांचे अभियंता, तांत्रिक व्यक्ती हे देखील गावाला तांत्रिक मार्गदर्शन करतील.दरवर्षी गावाच्या अबंध निधीतून झालेली कामे, खर्चाची तपासणी आणि लेखाजोखा गावानेच करावयाचा आहे. त्याकरीता त्याची संपूर्ण माहिती ग्रामपंचायतीच्या नोंदवहीत नोंद करुन सूचना फलकावर जाहीर करणे अनिवार्य आहे. त्यामुळे गावात एकमेकांप्रती विश्वासाचे वातावरण निर्माण होऊन गावविकासात सर्वांचा मनापासून लोकसहभाग मिळण्यास मदत होईल.

**योजनेची माहिती :–**

पंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ हा कायदा देशातील १० राज्यांमध्ये दि. २४ डिसेंबर १९९६ रोजी लागू झाला आहे. केंद्र शासन स्तरावर हा कायदा पंचायती राज मंत्रालयाद्वारे राबवला जात आहे. महाराष्ट्र राज्यात पेसा

कायद्याच्या अंमलबजावणीची प्रमुख जबाबदारी ग्रामविकास व पंचायत राज विभागाकडे सोपविण्यात आलेली आहे.

**अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा बैठकीची कार्यपद्धती :–**

आदिवासी क्षेत्रातील गावांची स्वतंत्र सामाजिक, सांस्कृतिक ओळख व परिस्थिती विचारात घेऊन या ग्रामसभांच्या बैठकीबाबत पुढील विशेष बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

➢ ग्रामपंचायतीचा सचिव हा ग्रामसभेचा सचिव असतो. ग्रामसभेच्या बैठका बोलावण्याची जबाबदारी सचिवाची असते.

➢ ग्रामसभेच्या सर्व सभांची कार्यवृत्ते सचिव तयार करतो, त्याच्या अनुपस्थितीत त्या सभेत अध्यक्ष म्हणून काम पाहत असलेल्या व्यक्तीकडून याबाबतीत निश्चित केलेला कोणताही अधिकारी अशी कार्यवृत्ते तयार करतो.

➢ पंचायतीच्या सचिवाने ग्रामसभेच्या बैठकीची तारीख निश्चित करून पूर्ण पंधरा दिवसांपेक्षा कमी नसतील इतके दिवस अगोदर, ग्रामसभेच्या प्रत्येक बैठकीची तारीख, वेळ व ठिकाण, ग्रामसभेच्या संबंधित अधिका–यांना व सदस्यांना कळविणे आवश्यक आहे.

➢ ग्रामसभेने सूट दिली नसेल तर, ग्रामसभेच्या प्रत्येक बैठकींना संबंधित गाव कोतवाल, तलाठी, पोलिस पाटील, आरोग्य अधिकारी, प्राथमिक व माध्यमिक शाळेचा मुख्याध्यापक, कृषी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचा कनिष्ठ अभियंता व पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांनी उपस्थित रहावे असा निर्देश आहे.

➢ ग्रामसभा बैठकीची गणपूर्ती ही मतदारांच्या यादीत समाविष्ट असलेल्या व्यक्तींच्या एकूण संख्येच्या पंचवीस टक्के किंवा शंभर व्यक्ती यांपैकी जी संख्या कमी असेल त्या संख्येने होईल. गणपूर्तीशिवाय, तहकूब बैठकीसह कोणतीही बैठक घेता येत नाही.

पंचायत क्षेत्रांतर्गत एकाहून अधिक ग्रामसभांशी संबंधित कोणत्याही बाबीवर ग्रामसभांमध्ये विवाद उत्पन्न झाल्यास तो त्या पंचायतीच्या सर्व ग्रामसभांच्या संयुक्त सभेपुढे आणला जातो आणि अशा संयुक्त सभेत बहुमताने घेतलेला निर्णय, प्रत्येक ग्रामसभेने घेतलेला निर्णय आहे, असे मानण्यात येते.या क्षेत्रातील ग्रामसभा बैठकांचे कामकाज शक्यतो सर्वसंमतीने चालविले जाते. मात्र एखाद्या विषयाबाबत सर्वसंमती न झाल्यास पुढील बैठकीत तो विषय चर्चेसाठी घेण्याची तरतूद आहे. दुसर्या बैठकीतही एकमत होऊ न शकल्यास त्या बैठकीत बहुमताच्या आधारे निर्णय घेतला जावा अशी तरतूद आहे. सरपंच किंवा उपसरपंच हे ग्रामसभेने केलेल्या सूचना व ठराव किंवा यथास्थिती उपसरपंचाकडून याबाबत कोणतीही बेपर्वाई झाल्यास आणि ग्रामसभेने तीन चतुर्थांश बहुमताने त्या अर्थाचा ठराव संमत केल्यास सरपंच किंवा यथास्थिती उपसरपंच त्या पदावर राहण्यास व उर्वरित काळासाठी अशा पदावर निवडला जाण्यास अपात्र ठरतो. मात्र सरपंच अथवा उपसरपंच यांच्या विरोधातला असा ठराव शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय अंमलात येत नाही.याशिवाय ग्रामसभेच्या विशेष सभेत गुप्त मतपत्रिकेद्वारे सरपंच किंवा यथास्थिती उपसरपंचांविरुद्ध अविश्वास प्रस्ताव संमत झाल्यास तो सरपंच किंवा यथास्थिती उपसरपंच पदावर असण्याचे बंद होईल. अशी विशेष सभा बोलवण्याची कार्यवाही पुढील प्रमाणे केली जाते.

**संशोधन विषय :–**

**'पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींचा अबंध निधीच्या माध्यमातून विकास याविषयी लाभार्थ्यांचे मत''**

**संशोधनाचे उद्देश :**

१) पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींचा अबंध निधीच्या माध्यमातून आदिवासींच्या वर्तमान स्थितीचा अभ्यास करणे

I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 396-400
A Double-Blind Peer Reviewed Journal
e-ISSN 2347 – 517X
Original Article

२) पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींचा अबंध निधीच्या माध्यमातून विकासाविषयी लाभार्थ्यांचे मत अभ्यासणे

**संशोधन आराखडा वनमुना निवड पध्दती :–**

प्रस्तुत संशोधन करतांना वर्णणात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात आलेला असून नमुना निवड करतांना गैरसंभाव्यता नमुना निवड पध्द

**निष्कर्ष :–**

१. ६१ टक्के उत्तरदात्यांच्या मते समाजाच्या मुख्य प्रवाहापासून आजही दूर असलेल्या आदिवासी भागातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी, त्या भागाच्या सामाजिक, नैसर्गिक आणि भौगोलिक संपन्नतेसाठी करण्यात आलेला पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) अधिनियम (पेसा) कायदा म्हणजे आदिवासी लोकांच्या आयुष्यात सकारात्मक परिणाम करणारा आहे.

२. ५३ टक्के उत्तरदात्यांच्या मते आदिवासी जमातीच्या लोकांच्या योजना संदर्भात प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यामध्ये असणारी उदासिनता दूर करण्यासाठी पेसा कायदयाची पारदर्शकपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

३. ७४ टक्के उत्तरदात्यांच्या मते आदिवासी जमातीच्या लोकांमध्ये अबंध निधीची मदत व शेतीकरिता कृषी विभागाकडून नियमित मार्गदर्शन व मेळाव्यांचे आयोजन करण्यात यावे.

४. ७७ टक्के उत्तरदात्यांच्या मते आदिवासी जमातीच्या लोकांना पुरक व्यवसायाकरिता मार्गदर्शन तसेच निधी उपलब्ध करून दयावा.

५. ६५ टक्के उत्तरदात्यांच्या मते आदिवासी जमातीच्या लोकांना आधुनिक प्रवाहामध्ये सामावून घेण्याकरिता मिळालेल्या संधीचा फायदा आदिवासींना मिळावा याकरिता आदिवासी नेत्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत.

**संदर्भ :–**

भांडारकर पु.ल. ''सामाजिक संशोधन पद्धती'' महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती.

राऊत वर्षा, आपला चंद्रपूर जिल्हा (जिल्हा विशेष) समाज कल्याण मासीक, नई बुलंदियो के सपने, जाने. –२००८.

स्मरणीका (सरदार पटेल,भारतीय आदिवासींच्या बोलीभाषा महाविद्यालय, चंद्रपूर) अक्षरबोली, हरीवंश प्रकाशन चंद्रपूर–२०१२.

माहीती पुस्तिका, अनुसूचीत जाती व इतर पारंपारिक वननिवासी, (वनहक्क मान्य करणे अधिनियम २००६), नियम २००८.

माहिती पुस्तिका, महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग, २०११–१२.

गोंडवाना कोईतुर (सा.), नेतृत्व अभावी दिशाहीन आदिवासी, दिनांक : १६.११.२००३.

गोंडवाना कोईतुर (सा.), घटनात्मक हक्क, राजकीय व सामाजिक नेतृत्व, दिनांक : १८.१०.२००३.

Reference to the degree of balance between nutrient intake and nutrient requirement .

This balance is affected by many factors including physiologic, physical development , cultural and economic

Martin, P., & Thomas, E. (2012). Social Media Usage and Empact. N ew Delhi: Global Vision Publishing House.

Mishra, R. (2012). Social networking sites as alternative tool of political communication: some grassroot experience. In A. Saxena, Issue of communication development and society. New Delhi: Kanishka Publications, Distributors.

Gagan, G. (2012). Social Media Networking and concept of International Citizenship. In A.Saxena (Ed.), Issue of communication development and society (pp. 163-167). New Delhi: Kanishka Publisher, Distributors.